भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2023

CM 078715

अनु.क्र. 279 दि. 19 APR 2024 मुल्य

१) दस्ताचा प्रकार : प्रतिज्ञापत्र

२) दस्त नोंदणी करणार आहेत का ?:- होय/नाही

३) मिळकतीचे वर्णन :

४) मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव :

५) पत्ता :

६) हस्ते व्यक्तीचे नांव :

७) पत्ता :

८) दुसऱ्या पक्षकाराचे नांव : PMRDA

मुद्रांक घेणाऱ्याची सही

विजय बबनराव भालेकर
परवाना क्र. २२०१०२७
७५/५९०, महर्षीनगर, पुणे-३७

वरिष्ठ कोषागार अधिकारी
पुणे

12 APR 2024

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

NOTARY
Rameshkumar B. Rage
Haveli, Pune(Mah.)
Reg.No. 16396
Exp. Date 27/01/2025
GOVERNMENT OF INDIA

## हमी पत्र

आज दिनांक ११/०४/२०२४ पुणे येथे

**मी श्री मनोज मदनलाल छाजेड**, डायरेक्टर, सिद्धी ग्रुप, मनोज छाजेड व्हेंचर्स, रजि. पत्ता : ११८, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक रोड, स्वारगेट कॉर्नर जवळ, सुभाष नगर, शुक्रवार पेठ, पुणे ४२, तालुका मुळशी, जिल्हा पुणे, येथील सिरॅनो फार्म्स **गट नं. ३०२ व ३०४(पै)** एकूण क्षेत्र २८,२००.०० चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी/बिगर निवासी पद्धतीच्या प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक / कुलमुखत्यार-पत्रधारक म्हणून मी दाखल केला आहे.

तुर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही याची माहिती मला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्धारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्धारे पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहे व त्यासंबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भू वैज्ञानिक अधिकारी भुजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S. & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही करणे माझ्यावर बंधनकारक राहील.

इमारत पूर्ण झाल्यावर इमारतींमधील निवासी / बिगरनिवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करु शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतीमधील रहिवाशांना मी करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी या हमीपत्राद्धारे स्विकारत आहे.

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी कोणत्याही कोर्टकडे याबाबतीत दावा दाखल करणार नाही.

निवासी अगर व्यापारी गाळ्यांचे विक्रीचे बुकिंग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करुन घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतर सुद्धा याठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत माझ्या खर्चाने पुरेसा पाणीपुरवठा करून देण्याची माझी जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / ग्रामपंचायत ला तोषिस लागू देणार नाही.

NOTARY
Rameshkumar B. Kage
Haveli, Pune(Mah.)
Reg. No. 15396
Exp. Date 27/01/2025
GOVERNMENT OF INDIA